MHRG080001172012

भरत ब्रजलाल शहा वि.
पृथ्वीराज नानीकराम किसनानी वगैरे १

## नियमीत दिवाणी दावा क्र.१५०/२०१२ मधील
## निशाणी क्र.३६ खालील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून दावामिळकतीची मोजणी करण्यासाठी नियुक्ती करण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. वादी अर्जात कथन करतो की, पुर्वी तालुका अधिक्षक, भूमि अभिलेख यांची दावामिळकतीची मोजणी करण्याकरिता न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करण्यात आली होती. त्यांनी मोजणीच्या पुर्वीच्या नकाशामध्ये दावामिळकतीची चुकीची दिशा दाखवून, तो नकाशा दाखल केलेला होता. ती चुक न्यायालयीन आयुक्त यांच्या निदर्शनास आल्यानंतर, त्यांनी पुन्हा दुसरा नकाशा तयार करुन तो न्यायालयात दाखल केला. वादीचे असे कथन आहे की, पुर्वीचे न्यायालयीन आयुक्त म्हणजेच तालुका अधिक्षक, भूमि अभिलेख यांनी दावामिळकतीची मोजणी व्यवस्थित केलेली नाही. त्यामुळे, वादीने जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख यांची नियुक्ती न्यायालयीन आयुक्त म्हणून करावी अशी विनंती केलेली आहे.

०३. त्याउलट, प्रतिवादींनी निशाणी क्र.३७ अन्वये म्हणणे देऊन अर्जाला हरकत नोंदविली आहे. त्यांनी असे कथन केलेले आहे की, न्यायालयाच्या ओदशानंतर तालुका उपअधिक्षक, भूमि अभिलेख, खालापूर यांनी जागेवर जावून मोजणी करुन त्याप्रमाणे मोजणी अहवाल नकाशासह दाखल केलेला होता. त्या अहवालास व नकाशास वादीने हरकत घेऊन पुन्हा मोजणी करण्याची मागणी केली. त्याप्रमाणे पुन्हा न्यायालयीन आयुक्त यांना मोजणी करण्यास सांगितले. त्यांनी पुन्हा मोजणी करुन वस्तुस्थिती दर्शक नकाशा व अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे, प्रतिवादींनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. उभय पक्षकार व त्यांचे विधिज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता, ते गैरहजर आहेत. प्रस्तुतचा अर्ज सन २०१५ पासून युक्तीवादासाठी प्रलंबित आहे.

दि.२८/०१/२०२१ रोजी अर्जावर आदेश पारित करुन वादीला युक्तीवाद करण्याचे निर्देश दिलेले होते. तरीदेखील, वादी अथवा प्रतिवादी यांनी अर्जाचेकामी युक्तीवाद न केल्यामुळे, अर्ज गुणदोषावर आदेशासाठी ठेवण्यात आला.

०५. प्रकरणाचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तुतचा दावा, प्रतिवादीने केलेले तथाकथित अतिक्रमण काढून मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. दावा अतिक्रमणाचा असल्यामुळे, माझे पुर्वपिठासीन अधिका-याने निशाणी क्र.२१ वर आदेश पारित करुन उपअधिक्षक, भूमि अभिलेख, खालापूर यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक केलेली होती. तसेच, न्यायालयीन आयुक्त यांना, वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीची एकत्रित मोजणी करुन, तसा अहवाल नकाशासह दाखल करण्याचे आदेश दिलेले होते. त्याप्रमाणे, उपअधिक्षक, भूमि अभिलेख, खालापूर यांनी निशाणी क्र.३५ वर नकाशासह अहवाल दाखल केलेला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर, वादीने निशाणी क्र.३० वर अर्ज दाखल करुन पुन्हा मोजणी करण्याची विनंती केलेली होती. त्याप्राणे माझे पुर्वपिठासीन अधिका-याने तसे आदेश पारित करुन खुलास मागविला. त्याप्रमाणे, उपअधिक्षक, भूमि अभिलेख, खालापूर यांनी निशाणी क्र.३२ च्या अहवालासोबत दुसरा नकाशा दाखल केला.

०६. वादीचे असे कथन आहे की, न्यायालयीन आयुक्त यांनी पुन्हा दुसरा नकाशा तयार करुन न्यायालयात दाखल केल्यामुळे, मोजणीचे काम व्यवस्थित झालेले नाही. त्यामुळे, त्याने मोजणी जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख यांच्यामार्फत करण्याची विनंती केलेली आहे. फक्त न्यायालयीन आयुक्तांनी दुसरा मोजणी नकाशा दाखल केला म्हणजे ती मोजणी व्यवस्थित झालेली नाही असे निष्कर्श काढणे उचित होणार नाही. त्यासाठी वादीने नकाशामध्ये दर्शविलेली वस्तुस्थिती आणि प्रत्यक्ष जागेवरील वस्तुस्थिती ही भिन्न असल्याचे दाखविणे गरजेचे आहे. परंतु, तशी कोणतीही बाब वादीने अर्जामध्ये स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे, न्यायालयीन आयुक्तांनी फक्त दुसरा नकाशा अभिलेखावर दाखल केला म्हणून ती मोजणीच व्यवस्थित झालेली नाही असे निष्कर्श काढणे प्रथमदर्शनी तरी उचित होणार नाही. त्यासाठी सविस्तर पुराव्याची आवश्यकता आहे. सबब, वर नमुद कारणांवरुन वादीचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे:-

**:-आदेश-:**

| | |
|---|---|
| **०१.** | अर्ज (निशाणी क्र.३६) नामंजुर करण्यात येतो. |
| **०२.** | खर्चाबाबत आदेश नाही. |

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

सही/-

दिनांकः ०४/१०/२०२१

खालापूर.

**(श्री.पी.एम.माने)**

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

खालापूर